# घराविना माणसं... अन्नाविना जग...

**चन्द्रशेखर पुरन्दरे**

**जागतिकीकरणाने ठळकपणे पुरस्कार केलेल्या बाजारकेंद्रित व्यवस्थेने आता आपले 'रंग' दाखवण्यास सुरूवात केलीय! बँकांच्या नफेखोर आततायी-अनागोंदी व्यवहारांमुळे अमेरिका आणि पर्यायाने सर्व जगच मंदीच्या खाईत लोटलं जातंय. गृहकर्जाचा डोलारा कोसळल्याने सर्वसामान्यांच्या डोक्यावरचं छप्पर हिरावून घेतलं जातंय, तर अन्नधान्याच्या तुटवड्यामुळे लोक रस्त्यावर येऊ लागलेत. संपूर्ण जगासमोरच अभूतपूर्व अन्नसमस्या उभी ठाकलीय...**

पश्चिमेच्या जगात मंदीच्या भीतीनं पुन्हा एकदा डोकं वर काढलं आहे. गेल्या वर्षीपासून अमेरिका-युरोपमध्ये आर्थिक अनागोंदीचं वातावरण आहे. आगामी वर्षांत राष्ट्रीय उत्पन्न घटणार असल्याचे अंदाज व्यक्त होत आहेत. मंदीची ही लाट केवळ पश्चिमी देशांमध्येही नव्हे, तर साऱ्या जगात पसरण्याची भीती आहे. यात भर म्हणून जगभरात अन्नधान्याचे भाव कडाडले आहेत आणि त्यामुळे असंतोष उफाळून येत आहे.

या दोन्ही घडामोडींना जागतिकीकरणाचे पदर आहेत. पश्चिमेतील आजच्या आर्थिक पेचाला सुरूवात अमेरिकेत झाली. घरं विकत घेण्यासाठी कर्ज देणाऱ्या बँका तिथं अधाशीपणानं वागल्या आणि सरकारनं त्याकडं दुर्लक्ष केलं. घर विकत घ्यायचं तर सामान्य माणसाला कर्ज काढावं लागतं. हे कर्ज कोणाला किती द्यायचं याचे काही निकष असतात. कर्ज मागणाऱ्याचं वय, नोकरी-व्यवसायाची स्थिरता, मासिक उत्पन्नाची हमी वगैरे अटी असतात. दोन-तीन वर्षांपूर्वीपर्यंत कर्ज देण्याआधी या अटी काटेकोरपणे तपासून पाहिल्या जात असत. पण अमेरिकेत अशी परिस्थिती निर्माण झाली, की एकीकडे घरांच्या किमती वाढत होत्या, पण दुसरीकडे घरं विकत घेणाऱ्यांची संख्या कमी होत होती. घरांसाठी कर्जवाटपाचं प्रमाण वाढलं तर उलाढाल आणि नफा वाढेल, या हिशेबानं तेथील बँकांनी कर्ज देण्याच्या अटी शिथिल केल्या. वास्तविक, तोपर्यंत तरुण, सुरक्षित व चांगल्या पगाराची नोकरी असणारा ग्राहक बँकेच्या दृष्टीनं 'पहिल्या' पसंतीचा ग्राहक होता. बहुधा कर्ज अशाच ग्राहकांना दिली जात असत, कारण परतफेडीची खात्री असे. पण दोन-तीन वर्षांपासून जास्त नफ्याच्या लोभानं बँकांनी 'दुसऱ्या' दर्जाच्या ग्राहकांना आकर्षित करण्याचं ठरवलं. ज्यांच्या नोकऱ्या किंवा धंदे फारसे सुरक्षित नाहीत, ज्यांची मिळकत कमी आहे, ज्यांचा कर्जांबाबतचा पूर्वेतिहास फारसा चांगला नाही असे लोक म्हणजे 'दुसऱ्या' दर्जाचे ग्राहक. अशा ग्राहकांना 'सब-प्राइम' ग्राहक म्हणतात. नव्या धोरणानुसार 'प्राइम' ग्राहकांपेक्षा जास्त व्याजदरानं, पण असुरक्षित तारणावर अशा 'सब-प्राइम' ग्राहकांना मोठ्या प्रमाणावर कर्जवाटप झालं. त्यामुळे सुमारे एक कोटी अमेरिकनांचं 'असावे घरकुल आपुले छान' हे स्वप्न आचनक साकार झालं.

बँकांना दिलेल्या सवलतींमुळे कर्जफेडीचा मासिक हप्ता लोकांच्या आवाक्यात आला. कर्ज सहज व सुलभ हप्त्यांवर उपलब्ध होऊ लागल्यामुळे ग्राहकांनी अटींची तपशीलवार तपासणीही केली नाही. स्वस्तात कर्ज मिळत आहे, तर घर घ्यावं; घरांच्या किमती वाढतच आहेत, तर वष-दोन वर्षांत घर विकावं आणि 'पहिल्या' पसंतीचं दुसरं घर कमी व्याजदरावर नव्या कर्जानं घ्यावं, असा विचार बहुतेकांनी केला. पण लवकरच घरांच्या किमती घसरू लागल्या. अमेरिकेच्या मध्यवर्ती बँकेनं दोन-तीन वर्षांत व्याजदरात सतरा वेळा वाढ केली. त्यामुळे कर्जांवरील व्याजाचा दरही वाढला. उदाहरणार्थ, एक हजार डॉलर्सचा मासिक हप्ता एकदम अडीच हजार डॉलर्सवर पोहोचला. तो या ग्राहकांना परवडणं अशक्य होतं. घरांचे भाव कमी झाल्यानं घर विकणं हा तोट्याचा पर्याय आणि कर्जाचा हप्ता तर भरता येत नाही, अशा कात्रीत कित्येक लाख अमेरिकन अडकले.

कर्जवसुली थांबल्यामुळे बँकांही अडचणीत आल्या. कर्ज देणारी एक बँक असली तरी तिचा पैसा आणखी दहा बँकांकडून येतो. त्यांचा पैसा आणखी दहा बँकांकडून, अशी ही साखळी किंवा शिडी असते. शेवटी त्या देशाच्या मध्यवर्ती बँकेपाशी ही शिडी थांबते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत ही मालिका चांगलीच गुंतागुंतीची झाली आहे. या प्रकरणात केवळ अमेरिकेतीलच नव्हे, तर युरोपीय आणि अनेक बहुराष्ट्रीय बँकांचा पैसा धोक्यात आला. कर्जाची थकबाकी काही हजार कोटींवर गेल्यावर (आणि मुख्य म्हणजे अमेरिकेत प्रश्न उद्‌भवल्यामुळे) अमेरिकन सरकार

जागं झालं. काही बँकांना वाचवण्यासाठी सरकारला गंगाजळी ओतावी लागली. अनेक बँकांच्या पदाधिकाऱ्यांच्या नोकऱ्या गेल्या. यात जर्मनीतील एका प्रांताच्या गव्हर्नरचा राजकीय बळी गेला. या व्यवहारात पैसा गुंतलेल्या एका जर्मन बँकेशी त्याचे घनिष्ठ संबंध असल्याचं उघडकीला आल्यामुळे त्याला राजीनामा देणं भाग पडलं. आयकेबी नावाच्या दुसऱ्या एका जर्मन बँकेनं असाच पैसा गुंतवला होता आणि तो पाण्यात गेला. याबद्दल बँकेचे भागधारक आता बँकेवर नुकसानभरपाईचा खटला भरत आहेत. तिसरी एक जर्मन बँक अशीच बुडाली. सिटी बँक, यूबीएस बँक या बहुराष्ट्रीय बँकांनी हजारो कोटींचा तोटा वर्षाच्या पहिल्या तिमाहीतच नोंदवला आहे. रॉयल बँक ऑफ स्कॉटलंड ही दुसऱ्या क्रमांकाची ब्रिटिश बँक पैसा उभा करण्यासाठी आता राइट इश्यू काढत आहे. परिणामत: आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भांडवल एकदम आटलं आहे. नवीन कर्जवाटप तर आखडलं आहेच; पण ज्यांच्या परतफेडी व्यवस्थित चालू आहेत, अशा लोकांनाही वाढीव व्याजदराला रातोरात सामोरं जावं लागलं आहे. पूर्वीचे व्याजदर कायम ठेवावेत, ही ब्रिटिश पंतप्रधानांची विनंतीही बँकांनी मानली नाही. उलट, कर्जाविषयीचे नियम आणखीच जाचक केले आहेत. उदाहरणार्थ, घराच्या किमतीच्या काही टक्के (दहा ते पंचवीस टक्के) रक्कम आजवर परत केली नसेल, तर कर्जाचं नूतनीकरणच आता ब्रिटिश बँकांनी थांबवलं आहे. या वाढीव व्याजदरामुळे आणि व्याज मुद्दलात जमा करण्याच्या क्लृप्तीमुळे २०१० सालापर्यंत दहातला एक ब्रिटिश घरमालक 'ऋण भागीदार' (निगेटिव्ह इक्विटी होल्डर) होईल असा अंदाज आहे. दुसऱ्या शब्दांत, तो घर विकूनदेखील कर्जातील मुद्दलही परत करू शकणार नाही, त्याचं कर्ज वाढतच जाणार, आणि घरांच्या किमती तर गोठल्या आहेत, त्या खाली यायला सुरूवातही झाली आहे.

अमेरिकेत तर ही परिस्थिती आजच आली आहे. कर्जवसुली थांबल्यानं अनेक बँकांनी घरं ताब्यात घ्यायला सुरूवात केली आहे; पण घरांच्या किमतीच कमी झाल्यानं बँकेनं ठरवलेल्य किमतीला लिलावात घर विकत घ्यायलाही कोणी पुढं येत नाही. म्हणजे बँकेचा तोटा तर भरून निघत नाहीच, पण अनेकांना बेघर व्हावं लागत आहे. अशा अनेक कर्जबाजारी लोकांनी स्वत:च्याच घराच्या खिडक्या फोडणं, भिंतींची, जमिनीची नासधूस करणं असे उद्योगही केले, जेणेकरून बँकेचा तोटा वाढावा.

या 'दुय्यम' ग्राहकांमध्ये अमेरिकेतील दुबळ्या वर्गाचं प्रमाण जास्त आहे. कृष्णवर्णीय, लॅटिन अमेरिकन आणि एकट्या माता यांना ही कर्जं जास्त करून मिळाली. अल्पावधीत बेघर होण्याची वेळही त्यांच्यावरच आली आहे. सामाजिक अशांततेत आणि गुन्हेगारीत त्यामुळे वाढ अपेक्षित आहे. घर विकलं जात नसल्यानं इतर अनेकांना दुसऱ्या गावात नवी नोकरी स्वीकारणंही अशक्य झालं आहे. प्रश्न आता फक्त गृहक्षेत्राशी संबंधित राहिलेला नाही. एकूणच, आर्थिक भांडवल कमी झाल्यानं इतर उद्योगांना वित्तपुरवठा कमी झाला आहे. त्यामुळे नोकऱ्यांवर गदा यायला सुरूवात झाली आहे. सिटी बँकेनं ९ हजार लोक कामावरून कमी करणार, असं जाहीर केलं आहे. एकट्या लंडन शहरातच ४० हजार लोक बेरोजगार होतील असा अंदाज आहे. शिवाय बँकांनी जो अवाढव्य तोटा केला आहे. त्याची झळ लवकरच सगळ्याच करदात्यांना, समाजाला पोहोचणार आहे.

पश्चिमी जग या आर्थिक मंदीच्या भीतीखाली असल्यामुळे उर्वरित जगातील अन्नाच्या तुटवड्याची वावटळ आपल्या दाराशी पोहोचपर्यंत हे देश गाफील राहिले. आता मात्र, म्हणजे एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात. जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्या प्रमुखांची या विषयावर आणीबाणीची शिखर परिषद झाली. जगातील या दोन सर्वांत महत्त्वाच्या वित्तसंस्थांच्या धोरणांवर विशेषत: तिसऱ्या जगाचं जीवनमान ठरतं.

गहू, तांदूळ, मका, सोयाबीन ही जगातील प्रमुख धान्यं. यापैकी कोणतं ना कोणतं धान्य जगाच्या रोजच्या आहाराचा प्रमुख घटक असतं. या सगळ्या धान्यांचे भाव गेल्या काही महिन्यांत ७५ टक्क्यांपासून २०० टक्क्यांपर्यंत वाढले आहेत. जगात सुमारे एक अब्ज लोक दारिद्र्यरेषेखाली आहेत. या रेषेच्या जरा वर असणारे आणखी कित्येक कोटी लोक आहेत. त्यांच्यापैकी अनेक लोक आता दारिद्र्यरेषेखाली जायला सुरुवात झाली आहे. समजा, लोकांचा अन्नावरील खर्च याआधी मिळकतीच्या पन्नास टक्के असेल, तर तो आज ८० टक्क्यांवर पोहोचला आहे. जागतिक बँकेच्या अंदाजानुसार ३७ देशांत या महागाईमुळे दंगली, हिंसक चळवळी व प्रसंगी अराजक माजण्याची शक्यता आहे. फिलिपिन्स, इंडोनेशिया, बांगलादेश, इजिप्त, आफ्रिकेतील अनेक देशांमध्ये लोक भुकेने रस्त्यावर यायला लागले आहेत. युरोपात इटलीतही भाववाढविरोधी निदर्शनं झाली. डुकरांची पैदास करणाऱ्या ब्रिटिश शेतकऱ्यांनीही लंडनमध्ये निदर्शनं केली. येमेनमध्ये, इजिप्तमध्ये दंगलीत काही बळीही गेले, हैती या देशाच्या पंतप्रधानाला राजीनामा द्यावा लागला. तिथं तर लोकांना मातीच्या भाकऱ्या खाणं भाग पडलं आहे. कोणत्याही देशात अशी अशांतता माजली की व्यापार थंडावतो, नवीन भांडवली गुंतवणूक करायला संस्था कचरतात, इतर देशांशी व्यवहारही थांबतो. एकूण जागतिकीकरणाला खीळ

बसते. त्यामुळे आता पश्चिमी जग खडबडून जागं झालं आहे. अन्नधान्याच्या जागतिक तुटवड्यामुळे भारत, मेक्सिको, पाकिस्तान वगैरे अनेक देशांनी आपल्यालाच धान्य लागेल म्हणून धान्याची निर्यात थांबवली आहे. त्यामुळे युरोपमध्ये अन्नधान्याच्या किमतीही वाढू लागल्या आहेत.

या समस्यांमागे अनेक वर्षांच्या अनेक प्रक्रिया कारणीभूत आहेत. एक म्हणजे विकसनशील देशात शेतीकडे गेली अनेक वर्षं पद्धतशीर दुर्लक्ष झालं आहे. शेतीवर गुजराण होऊ न शकल्यानं शहरीकरण वाढत आहे. मानवी इतिहासात प्रथमच पुढच्या दहा-पंधरा वर्षांत जगाच्या एकूण लोकसंख्येच्या पन्नास टक्क्यांहून जास्त लोक शहरांत राहू लागतील. त्यामुळे एकीकडे शेतजमिनी ओस पडत आहेत आणि दुसरीकडे हे लोक अन्नधान्याचे जास्तीचे ग्राहक झाल्याने उर्वरित शेतीवर ताणही वाढला आहे. त्याबरोबरच जगातील अनेक देशांतील यादवी सदृश्य परिस्थितीमुळे कित्येक लाख लोक त्यात बहुसंख्य शेतकरी/निर्वासित झाले आहेत. सुदान या आफ्रिकेतील एका देशातच शेती सोडून निर्वासित छावण्यांमध्ये आश्रय घेण्यात भाग पडलेल्यांची संख्या वीस लाख आहे. युद्धामुळे इराकमध्ये दहा लाख शेतकरी देशोधडीला लागले आहेत. अशा भूभागातील शेती थांबते आणि या लोकांना जगवण्यासाठी अन्नपुरवठा इतर जगाला करावा लागतो.

पर्यावरणाच्या हानीमुळे पूर, दुष्काळ, वणवे वाढत आहेत आणि जगातील कसण्यायोग्य शेतजमीन दरवर्षी कमी होत आहे. या बाबतीत ऑस्ट्रेलियाचं उदाहरण पाहता येईल. तिथं गेली सहा वर्षं सतत दुष्काळ आहे. दोन कोटी लोकांना पुरेल इतका तांदूळ ऑस्ट्रेलिया निर्यात करत असे. ते प्रमाण आज शून्यावर आलं आहे. ऑस्ट्रेलियन गव्हाची निर्यातही अगदी कमी झाली आहे. पेट्रोलचे भाव गेले काही महिने सतत वाढत आहेत. त्यामुळे धान्याच्या निर्यातीचा वाहतूकखर्चही वाढला आहे. दुसऱ्या बाजूला बी-बियाणं आणि खतं यांचाही वाहतूकखर्च वाढला आहे. या साऱ्याचा परिणाम म्हणजे शेती करणं फायदेशीर राहिलेलं नाही.

गेल्या दहा-वीस वर्षांत भारत-चीनमध्ये मध्यमवर्ग प्रचंड प्रमाणात वाढला आहे. या काही कोटी लोकांच्या खाण्याच्या सवयी बदलल्या आहेत. १९८५ साली एक चिनी माणूस वर्षात २० किलो मांसाहार करत असे. आता तो ५० किलोंहून जास्त मास एका वर्षात खातो. मांसाहार फार मोठ्या प्रमाणात पर्यावरणाची हानी करतो. कारण खाण्यात येणारे प्राणी - शेळ्या, मेंढ्या, डुकरे, गाई यांची जोपासना करायला मोठी कुरणं लागतात. मांसाहाराबरोबरच दुग्धजन्य पदार्थांचं प्रमाणही मध्यमवर्गाच्या आहारात जास्त असतं. त्याचाही पर्यावरणावर ताण पडतो. कारण गाई-म्हशींना चारा पुरवण्यासाठी पारंपरिक धान्य पिकवणाऱ्या शेतजमिनींवर गवताची लागवड होते. या साऱ्यात भर म्हणून गेल्या दोन वर्षांपासून पेट्रोलला पर्यायी जैविक इंधनाचा पश्चिमेनं हिरीरीनं पुरस्कार आरंभला. मक्यापासून बनवलं जाणारं इथेनॉल नावाचं इंधन पेट्रोलऐवजी मोटारगाड्यांत वापरावं, असं धोरण अमेरिका-युरोपनं आखलं, ज्यायोगे खनिजतेलाचा वापर कमी होईल. इथेनॉलसाठी मका पुरवण्यात पैसा जास्त असल्यानं अमेरिका आणि दक्षिण अमेरिकेतील पारंपरिक धान्याखालच्या जमिनी मक्याच्या लागवडीखाली गेल्या आणि पारंपरिक धान्याचा तुटवडा वाढला. आता व्यापाऱ्यांनी धान्याची साठेबाजी सुरू केली आहे. अन्नधान्याच्या भविष्यातील किमतीवर आंतरराष्ट्रीय स्तरावर सौदेबाजीलाही उधाण आलं आहे. या सौदेबाजीमुळे भाव कृत्रिमपणे वाढवले जातात आणि सौदे करणाऱ्यांच्या आर्थिक लाभाखेरीज कोणताच सामाजिक फायदा होत नाही. शिकागोच्या अशा वायदे बाजारात या वर्षीच्या पहिल्या तीन महिन्यांतच उलाढाल वीस टक्क्यांनी वाढली. आता रोजचे दहा लाख्ख वायदे होतात आणि आंतरराष्ट्रीय बाजारातले धान्याचे भाव ठरतात.

अमेरिका-युरोपमधील गृहकर्जांची समस्या आणि जागतिक स्तरावरील अन्नधान्याचा तुटवडा. या घडामोडी निवारा आणि अन्न या मूलभूत मानवी गरजांशी निगडित आहेत. या गरजा भागवणं हे त्या-त्या देशाचं कर्तव्य आहे की नाही, हा प्रश्न जागतिकीकरणानं स्पष्टपणे उभा केला आहे. जागतिकीकरणाचा एक पैलू म्हणजे पश्चिमेतील देशांचं धोरण जेवढं राजकीय नेतृत्व ठरवतं त्याहून अधिक प्रमाणात 'तज्ज्ञ' ठरवतात. मग ते तज्ज्ञ अर्थतज्ज्ञ असतील. व्यवस्थापनतज्ज्ञ असतील किंवा तंत्रज्ञ असतील. या मंडळींना जागतिकीकरण हा एक प्रकल्प वाटतो. त्यांना तो चालवता येत नाही, हे वारंवार स्पष्ट होत आहे. याचं कारण म्हणजे तज्ज्ञांची सामाजिक बांधिलकी राजकीय नेतृत्वाइतकी प्रखर नसते. राजकारण्यांसारखे ते समाजाला उत्तरदायीही नसतात. राजकीय नेतृत्वाला किमान निवडून न येण्याची भीती तरी असते. त्या दडपणाखाली का होईना, जनहितकारक धोरणं आखावी लागतात. तज्ज्ञांचं तसं नाही. एखादा निर्णय लोकांच्या विरुद्ध गेला तरी ते नामानिराळे राहतात. राजकीय नेतृत्व सामाजिक जबाबदारी अशी झटकू शकत नाही. जागतिकीकरण नेमकं हे नेतृत्वच कमकुवत करतंय.

उदाहरणार्थ, अमेरिकेतील घरांच्या कर्जाचं उदाहरण जरा खोलात जाऊन पाहू. बँकांनी सवलतीची कर्जं दिली ती काही गरीबांना स्वत:ची घरं असावीत, या उदात्त ध्येयानं दिली नाहीत. त्यांनी कर्जं दिली आपला फायदा व्हावा म्हणून. फायदा होत नाही म्हटल्यावर लोकांना रस्त्यावर आणण्यात या बँकांना काहीच वावगं वाटत नाही. तज्ज्ञांनी घेतलेले निर्णय असे

असतात. राजकीय नेतृत्वाकडून अपेक्षा लोकहिताची असते. जागतिकीकरणाचा युरोपातील दुसरा पैलू म्हणजे आजवर युरोपात कल्याणकारी राज्य हा आदर्शवाद होता. अर्थसंस्था, उद्योगधंदे या चौकटीत काम करत. जागतिकीकरणामुळे हा आदर्शवादच राहिलेला नाही. जुनी चौकट मोडली आणि त्या जागी ध्येयवादशून्य नफ्याचं गणित आलं आहे.

तज्ज्ञांनी आखलेल्या योजनांवर मानवी व्यवहार चालत नाहीत. तज्ज्ञांनी सुचवलेल्या हरितक्रांतीनं एव्हाना जगात अन्नाचा तरी तुटवडा पडायला नको होता. अनेक देशांनी तसं नियोजनही केलं. प्रत्यक्षात काय झालं, तर जमिनीखालचं पाणी संपुष्टात आलं. खतांनी जमिनी नापीक झाल्या आणि टंचाई कायम राहिली, पर्यावरणाची हानी वाढली.

एका मतप्रवाहानुसार चीनने जागतिक बँकेनं सुचवलेल्या जागतिकीकरणाच्या धोरणाकडे संपूर्ण दुर्लक्ष केलं म्हणून त्याची एवढी आर्थिक प्रगती इतक्या अल्पावधीत झाली. चीनने आपल्या देशाला सोसतील अशीच धोरणं राबवली. अमेरिकेच्या प्रभावक्षेत्राखालील दक्षिण अमेरिकेतील ज्या देशांनी जागतिक बँकेच्या नियमांचं तंतोतंत पालन केलं त्यांच्या उत्पन्नात ८० पासूनच्या दशकात घटच झाली किंवा ९० च्या दशकात एक टक्का अशी जेमतेम वाढ झाली.

सर्वे यत्र विनेतार: सर्वे पण्डितमानिन:।

सर्वे महत्त्वमिच्छन्ति तद्राष्टं अवसीदति॥

सगळेच जिथं नेते असतात, सगळेजण जिथं स्वत:ला विद्वान समजतात, सगळ्यांनाच जिथं महत्त्व हवं असतं. त्या राष्ट्राची अधोगती होते.

आणि ही जर पश्चिमेतील राष्ट्रं असतील, तर जागतिकीकरणाच्या मार्गानं ती उर्वरित जगालाही आपल्याबरोबर खाली खेचतील.

***चन्द्रशेखर पुरन्दरे***
*Email - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*

❒